Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

Original Article

# भारतीय स्वातंत्र्य लढ्यात तात्यासाहेब कोरे यांचे योगदान

**अजित एकनाथ पाटील**
संशोधक विद्यार्थी, ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी
**Email:** ajitpatil19682@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180306
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(A)
Pp. 30-32
March- 2026
**Submitted:** 15 Feb. 2026
**Revised:** 25 Feb. 2026
**Accepted:** 10 Mar. 2026
**Published:** 31 Mar. 2026

***सारांश***

*प्रस्तुत संशोधन लेखात भारतीय स्वातंत्र्य लढ्यात तात्यासाहेब कोरे (विश्वनाथ अण्णा कोरे) यांच्या योगदानाचा अभ्यास करण्यात आला आहे. 1942 च्या 'भारत छोडो' आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी वारणा-कोडोली परिसरात स्वातंत्र्याची चळवळ प्रभावीपणे पुढे नेली. महात्मा गांधी यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी केवळ आंदोलनात सहभाग घेतला नाही, तर क्रांतिकारकांना आश्रय, सहकार्य आणि मार्गदर्शनही केले. प्रतिसरकार चळवळीत त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. तात्यासाहेबांनी सामाजिक समता, शिक्षण, सहकार आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांतही मोठे कार्य केले. त्यांनी वारणा सहकार पॅटर्नद्वारे ग्रामीण भागाच्या विकासाला चालना दिली. त्यांच्या कार्यामुळे सामान्य जनतेत स्वातंत्र्याची जाणीव निर्माण झाली आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत झाले. अशा प्रकारे, तात्यासाहेब कोरे यांचे योगदान स्वातंत्र्यलढा आणि स्वातंत्र्योत्तर समाजनिर्मिती या दोन्ही स्तरांवर महत्त्वपूर्ण ठरते.*

***मुख्यशब्द:*** *तात्यासाहेब कोरे, भारत छोडो आंदोलन, स्वातंत्र्य लढा, प्रतिसरकार, वारणा कोडोली, सहकार चळवळ, ग्रामीण विकास, सामाजिक समता, गांधी विचार, क्रांतिकारक सहाय्य*

## प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अत्यंत महत्त्वपूर्ण आणि निर्णायक लढा म्हणजे 'भारत छोडो' आंदोलन होय. दुसऱ्या महायुद्ध काळातील वाढती महागाई, क्रिप्स वाटाघाटीमुळे देशात नैराश्य आणि वैफल्याचे वातावरण तयार झाले होते. याच कालावधीत वैयक्तिक सत्याग्रहाचा टप्पा संपला होता आणि संपूर्ण भारत एका निर्णायक लढ्यासाठी तयार झाला होता.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली कार्य करण्यासाठी अनेक तरुण तयार होते आणि महात्मा गांधीजींनी घोषणा केली की, 'प्रत्येक स्त्री पुरुषाने स्वतः लढ्यात सहभाग घ्यावा.' महात्मा गांधीजींनी 11 एप्रिल, 1942 रोजी 'ब्रिटिशांनी वेळीच भारत सोडून जाणे भारताच्या आणि ब्रिटनच्या हिताचे आहे.' असे वक्तव्य केले आणि 'हरिजन' या वृत्तपत्रातून चलेजाव संबंधीचा दृष्टिकोन मांडला. 08 ऑगस्ट 1942 रोजी मुंबई काँग्रेसच्या बैठकीत ठरावास मान्यता मिळाली आणि स्वातंत्र्य लढ्याचे अंतिम पर्वत सुरू झाले. 09 ऑगस्ट 1942 रोजी चलेजाव आंदोलनास सुरुवात झाली आणि संपूर्ण देशासह महाराष्ट्र पेटून उठला. महाराष्ट्रात ही अनेक ठिकाणी आंदोलनाने जोर धरला. त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा - कोडोली येथील एका उमद्या तरुणाने सहभाग घेतला आणि गांधीजींच्या आंदोलनास पाठिंबा दिला. त्यांच्याविषयी आणि त्यांच्या योगदानाबद्दल माहिती घेणे आवश्यक वाटते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील वीरांना आज स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवानंतर आठवणे म्हणजे त्यांना आदरांजली होय.

## संशोधन पेपरची उद्दिष्टे

1 विश्वनाथ अण्णा तथा तात्यासाहेब कोरे यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान स्पष्ट करणे.
2 वारणा कोडोली परिसराचा भारतीय स्वातंत्र लढ्यातील सहभाग प्रकाशात आणणे.
3 तात्यासाहेब कोरे आणि प्रति सरकार यांच्यामधील परस्पर सहकार्यात्मक संबंधांचा अभ्यास करणे.
4 सन 1942 च्या लढ्यातील तात्यासाहेब कोरे यांचे योगदान स्पष्ट करणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*अजित एकनाथ पाटील, संशोधक विद्यार्थी, ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी*

**How to cite this article:**
*पाटील, . अजित . एकनाथ . (2026). भारतीय स्वातंत्र्य लढ्यात तात्यासाहेब कोरे यांचे योगदान. Journal of Research & Development, 18(3(A)), 30–32. https://doi.org/10.5281/zenodo.19606888*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19606888
OPEN ACCESS

**संशोधन पेपरचे महत्व**

1 तात्यासाहेब कोरे यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान पुढील पिढ्यांना समजण्यास मदत होईल.
2 तात्यासाहेब कोरे यांचे समता जातीभेद विरहित समाजकारण समजण्यास मदत होईल.
3 तात्यासाहेब कोरे या आदर्शवत व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास केल्याने इतरांना प्रेरणा मिळण्यास मदत होईल.
4 भारतीय स्वातंत्र्यलढा विशेषतः सन 1942 च्या चलेजाव आंदोलनातील कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा कोडोली परिसराचा स्वयंस्फूर्त सहभाग स्पष्ट करता येईल.

**संशोधन पेपर पद्धती**

प्रस्तुत संशोधन पेपरसाठी 'ऐतिहासिक संशोधन' पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. ज्यामध्ये प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. (विविध ग्रंथ, मासिके, पाक्षिके, वर्तमानपत्रातील लेख, इंटरनेट, इ. उपयोग करून संशोधन पेपर बनवण्यात आला आहे.)

**मुख्य विषय :- 'भारतीय स्वातंत्र्य लढ्यात तात्यासाहेब कोरे यांचे योगदान'**

विश्वनाथ तथा तात्यासाहेब कोरे यांचा जन्म दि. 17 ऑक्टोबर, 1914 रोजी पन्हाळ्याच्या पायथ्याशी पूर्वेस व वारणा नदीच्या दक्षिणेस कोडोली या गावी झाला. शालेय जीवनातच त्यांना गुरु श्रीधरपंतांकडून भारतीय स्वातंत्र्य चळवळीविषयी माहिती मिळत होती. या कालावधीतच तात्यांच्या विचारांची जडणघडण होत होती. समाजातील आर्थिक विषमता, दारिद्र्य, जातीभेद या समस्याही त्यांना जाणवत होत्या. याच काळात छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सामाजिक क्रांतीची प्रचंड लाट निर्माण केली होती. त्याचा प्रभाव ही तात्यांच्या जडणघडणीत महत्त्वाचा ठरला.

सन 1940 मध्ये तात्यांची कोडोली नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. त्यांनी या कालावधीत शिक्षण, रस्ते आणि वैद्यकीय व्यवस्था यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. यामुळेच वारणा कोडोली परिसरात ते प्रसिद्ध झाले. त्यांच्या कार्याच्या कक्षा रुंदावत होत्या.

कोल्हापुरात प्रजा परिषदेच्या आंदोलनाने जोर धरला. प्रजा परिषदेची सभा तात्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने कोडोली येथे आयोजित केली होती. पुढे सातारा जिल्ह्यातील धामणी या ठिकाणी दि. 14 नोव्हेंबर 1938 रोजी प्रजा परिषद आयोजित केली होती. तिचे उपाध्यक्ष पद तात्यासाहेबांनी भूषविले. भाई माधवराव बागल हे अध्यक्ष होते. प्रजा परिषदेच्या कार्यामुळे त्यांना व त्यांचे सहकारी यांना पोलीसी जाचाला सामोरे जावे लागले होते. वारणा आणि कोडोली परिसरात जागृती घडवून आणण्याचे कार्य तात्यांनी हाती घेतले होते.

सन 1942 च्या चलेजाव आंदोलनात तात्यांचा सहभाग होता. ते 9 ऑगस्ट 1942 रोजी मुंबईच्या गोवालिया टॅंक मैदानावरती तिरंगा फडकविण्यासाठी यशवंतराव चव्हाण, किशोर उर्फ के. डी. पाटील या आपल्या जिवलग मित्रांसह उपस्थित होते. चलेजाव चळवळीत सहभागी होऊन मुंबईवरून परत येत असताना 'आपल्या वारणा खोऱ्यात स्वातंत्र्य चळवळीची मशाल धगधगती ठेवण्याचा निर्धार' तात्यांनी केला होता आणि पुढील काळात वारणा खोरे पेटून उठले. तात्यांनी क्रांतिकार्यात सहभाग घेणाऱ्या क्रांतिकारकांशी सलोखा ठेवला आणि त्यांना आवश्यक मदत कार्य चालू ठेवले.

सांगली, सातारा आणि कोल्हापूर या जिल्ह्यात क्रांतिकार्याने जोर धरला. 'प्रतिसरकार'चे कार्य सुरू झाले तशी तात्यांची जबाबदारी वाढली आणि ती फार जोखमीची होती. क्रांतिकारकांच्या गुप्त आश्रयाचे ठिकाण म्हणजे वारणा कोडोली येथील तात्यासाहेबांचा 'डागमळा' होय. सातारा पोलिसांची कारवाई टाळण्यासाठी कित्येक वेळा क्रांतिकारक वारणा नदी ओलांडून डागमळ्यात भूमिगत होण्यासाठी येत असत. यशवंतराव चव्हाण, क्रांतिसिंह नाना पाटील, आत्माराम जाधव, के. डी. पाटील यांनी कित्येकदा 1942 च्या लढ्याची सूत्रे या डागमळ्यातून हलवली. प्रतिसरकारला सर्वतोपरी मदत करण्याची उदात्त भूमिका तात्यासाहेब कोरे आणि त्यांच्या कुटुंबियांनी पार पाडली.

तात्यासाहेब कोरे यांच्या कोल्हापूर येथील धान्य दुकानामध्ये (वखार) ही क्रांतिकारकांना आश्रय दिला जात होता. वसंतदादा पाटील यांनी ही दोन दिवस पोलिसांना चकवा देऊन वखारीमध्ये वास्तव्य केले होते. तसेच अनेक क्रांतिकारक या ठिकाणी आश्रयास असत. तात्या त्यांची सर्व जबाबदारी घेत असल्याचे त्यांनी आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे. तात्या महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, इ. मोठ्या व्यक्तींच्या कार्याने प्रेरित होते. 10 जून 1946 रोजी कोडोली हायस्कूल सुरू केल्यानंतर त्यांनी व त्यांच्या सहकारी मित्रांनी शाळेच्या वस्तीगृहाचे नाव 'जयहिंद' असे ठेवले. त्यावेळी सुभाषचंद्र बोस यांच्या 'आझाद हिंद सेने'मुळे 'जयहिंद' लोकप्रिय बनले होते. या सर्व स्तरातील लोकांच्या सहभागामुळे ब्रिटिश सत्तेला 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य द्यावे लागले. वारणा पंचक्रोशीत स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवून सर्वसामान्यांना प्रवाहात आणण्याचे कार्य तात्यांनी केले. स्वातंत्र्याचा प्रथम दिवस 15 ऑगस्ट 1947. तो सामाजिक स्वातंत्र्याचा प्रथम दिवस सामाजिक समता राखून कसा साजरा करता येईल, याचे त्यांनी नियोजन केले. महात्मा गांधीजींच्या विचारांनी प्रेरित होऊन सर्व जाती जमातींनी एकत्र येऊन, तिरंगा झेंड्याच्या साक्षीने, मांडीस मांडी लावून, एकत्र सह भोजनाचा कार्यक्रम करावयाचे त्यांनी निश्चित केले. यावरून त्यांचे जातीभेद निर्मूलनाचे कार्य अधोरेखित आहे.

**समारोप**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पुढेही त्यांनी वारणा खोऱ्यातील 80 खेड्यांच्या विकासासाठी सहकाराचा विचार केला आणि जगभरात 'वारणा सहकार पॅटर्न'चा ठसा उमटवला. आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी जनकल्याणार्थ व्यतित केले. पुढील काळात

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

तात्यांनी महात्मा गांधी, वैकुंठभाई मेहता, यशवंतराव चव्हाण, रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या विचारांचा प्रभाव जोपासला आणि सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकास साधण्याचा प्रयत्न केला.

**निष्कर्ष**

वरील सर्व विवेचनावरून लक्षात येते की, भारतीय स्वातंत्र्य लढ्यात तात्यासाहेबांनी तळमळीने सहभाग घेतला आणि क्रांतिकारकांना सहकार्य केले. प्रसंगी स्वतः जबाबदारी स्विकारली. सामान्य जनतेला भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या प्रवाहात आणण्याचे कार्य तात्यासाहेबांनी केले. सन 1942 च्या चलेजाव आंदोलनातील प्रतिसरकारला सहकार्य करण्याच्या त्यांच्या भूमिकेचे कार्य उल्लेखनीय असे आहे. प्रामुख्याने गांधी विचारांनी चालणाऱ्या या महनीय व्यक्तीने पुढे स्वयंपूर्ण खेडी, ग्रामीण भागातील शिक्षण, कुटीरोद्योग, स्वावलंबी जीवन, कृषी व्यवस्थेला बळकटी आणि बळीराजाला आर्थिक संपन्न बनवण्यासाठीच आयुष्यभर प्रयत्न केले. अशा व्यक्तीच्या कार्याने समाजाचा आणि देशाचा विकास नक्कीच होईल असे वाटते.

**संदर्भसूची**

1. कोरे तात्यासाहेब मी : एक कार्यकर्ता, सकाळ पब्लिकेशन, कोल्हापूर. 1998. पृष्ठ - 69, 73, 81.
2. पाटील विश्वास – क्रांतिसुर्य, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. 2010 पृष्ठ - 102, 110, 112.
3. धर्माधिकारी भालचंद्र वि., महाराष्ट्राचे शिल्पकार – वसंतदादा. 1989. पृष्ठ – 42, 43.
4. पाटील प्र. शा. – स्वातंत्र्ययोद्धा. नवरंग प्रकाशन, कोल्हापूर. 1998. पृष्ठ - 72, 78, 80.
5. नाडगोंडा गुरुनाथ : व्याख्यान संग्रह. अमृतरंग, प्रकाशक : गुळवणी. 1988. पृष्ठ - 46, 47.